महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**पी.आर-३/यंत्रमाग/५३६२** **दिनांक : १७ फेब्रुवारी २००९**

## वाणिज्य परिपत्रक क्र.९३

**विषय :-** यंत्रमाग ग्राहकांना दिनांक ०१ जोनवारी २००९ पासून लागू होणारे शासनाचे सवलतीचे दर.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय दिनांक २६फेब्रुवारी २००८.
२) वाणिज्य परिपत्र क्र. ७७ दिनांक ०१ मार्च २००८.
३) शासन निर्णय क्र. टेरिफ २००८ / प्र.क्र. १४१/ ऊर्जा- ३ दिनांक ३१ जानेवारी २००९.

वरील संदर्भ क्र. (१) मधील शासन निर्णयानुसार उच्चदाब व लघुदाब यंत्रमाग धारकांना ०१ जानेवारी २००८ पासून वीज बिलात सवलत देण्याचा निर्णय घेतलेला होता. सदर सवलत ०१ जानेवारी २००८ पासून पुढील कालावधीकरीता होती. सदर निर्णय वाणिज्य परिपत्रक क्र. ७७ दिनांक ०१ मार्च २००८ नुसार अंमलबाजावणीकरीता सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आलेला होता.

वरील संदर्भ क्र. (१) मधील शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन शासन निर्णय क्र. टेरिफ २००८ / प्र.क्र. १४१/ ऊर्जा- ३ दिनांक ३१ जानेवारी २००९ अन्वये दिनांक ०१ जानेवारी २००९ पासून शासनाच्या पुढील आदेशापर्यंत यंत्रमाग धारकांना वीज बिलात सवलत देण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

१. (१) २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक जोडभार असणा-या ग्राहकांना दिनांक २६ फेब्रुवारी २००८च्या शासन निर्णयानुसार देण्यात येणा-या सवलतीमध्ये कोणताही बदल नाही.

***(२) २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक जोडभार असणा-या लघुदाब ग्राहकांना स्थिर आकारात १०० टक्के सवलत, वीज आकारात ६६.६६ टक्के सवलत व इंधन समायोजन आकारात ५० टक्के सवलत देण्यात यावी.***

(३) यामुळे संबंधीत वितरण परवानाधारकास कमी मिळणा-या महसूलाच्या फरकाच्या रकमेची भरपाई आवश्यक अर्थसहाय्य देऊन करण्यात यावी.

२. सदर आदेश दिनांक ०१ जानेवारी २००९ पासून लागू राहतील.

३. वर नमूद केलेले सवलतीचे दर पुढील आदेश होईपर्यंत लागू राहतील.

सदर आदेशामध्ये २७ अश्वशक्तीपर्यंत जोडभार असणा-या लघुदाब ग्राहक व उच्चदाब ग्राहक यांना वीज बिलामध्ये देण्यात येणा-या सवलतीमध्ये कोणताही बदल केलेला नाही. वाणिज्य परिपत्र क्र. ७७ दिनांक ०१ मार्च २००८ मध्ये नमुद केलेल्या सवलती २७ अश्वशक्ती पर्यंत जोडभार असणा-या लघुदाब ग्राहक व उच्चदाब ग्राहक यांना कायम असतील. तसेच सदर परिपत्रकात नमुद केलेल्या इतर सवलती कायम राहतील.

याबाबतीत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, दिनांक ०१ जानेवारी २००९ पासून शासनाच्या पुढील आदेशापर्यंत पुढील कालावधीकरीता वरील शासन निर्णयाप्रमाणे वीज बिलामध्ये सुधारीत सवलत देवून वीज बिले वितरीत करावीत.

नरेंद्रसिंह नायक.
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत माहितीस रवाना :-**

मुख्य महाव्यवस्थापक, (माहिती व तंत्रज्ञान).
-- वरील शासन निर्णयाच्या अनुषगाने यंत्रमाग धारकांच्या देयकाच्या संगणक प्रणालिमध्ये बदल करण्यात यावा.

**प्रत माहितीस रवाना :-**

सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ, (महावितरण)
सर्व अधिक्षक अभियंता, सं व सु मंडळ, महावितरण,
सर्व कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग, महावितरण,
सर्व उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता, सं व सु उपविभाग, महावितरण,

**प्रत सविनय सादर :-**

मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई.
१३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.

**प्रत सविनय सादर :-**

१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मंडळ, होल्डींग कंपनी मर्यादित, मुंबई.
२) व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, मुंबई.
३) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.ट्रान्समिशन कंपनी मर्यादित, मुंबई.
४) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पॉवर जनरेशन, कंपनी मर्यादित, मुंबई.
५) संचालक (संचलन), महावितरण.
६) संचालक (वित्त), महावितरण.
७) संचालक (दक्षता व सुरक्षा), महावितरण.

**प्रत सस्नेह रवाना :-**

१) कार्यकारी संचालक (वाणिज्य), म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित.
२) प्रादेशिक कार्यकारी संचालक - १ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, कल्याण.
३) प्रादेशिक कार्यकारी संचालक - २ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, पुणे .
४) प्रादेशिक कार्यकारी संचालक - ३ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, नागपूर.
५) कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन), महावितरण.
६) संचालक (दक्षता व सुरक्षा), महावितरण.

**प्रत रवाना :-**

१) मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा/(कर्मचारी वर्ग)/(तांत्रिक आस्थापना))/(माहिती व तंत्रज्ञान),महावितरण, मुंबई.
२) संचालक (अं.ले.प.), महावितरण, मुंबई.
३) मुख्य अभियंता (वितरण)/(पा. व नि.)/(अं.सु.)/(सां.नि.)/(वि.ख.)/(पायाभुत सुधारणा)/(ए.पी.डी.पी.आर.पी.)/(वि.प्र.कक्ष) महावितरण, मुंबई.
४) महाव्यवस्थापक (तांत्रिक)/ (वित्त संस्था)/(भंडार देयक)/(मंडळ लेखा)/ (तपासणी नियंत्रण कक्ष),महावितरण, मुंबई.
५) मुख्य अभियंता, (प्रशिक्षक संशोधन व विकास), महावितरण, नाशिक.
६) मुख्य विधि सल्लागार, महावितरण, मुंबई.
७) मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, मुंबई.
८) उप संचालक (द व सु), महावितरण, मुंबई/ पुणे/नागपूर.
९) कंपनी सचिव, महावितरण, मुंबइ
१०) अधिक्षक अभियंता (विनिक), महावितरण, मुंबई
११) मा. व्यवस्थापकीय संचालक, यांचे विशेष कार्य अधिकारी, महावितरण, मुंबई
१२) अतिरिक्त महाव्यवस्थापक, संगणक केंद्र, महावितरण, नागपूर/औरंगाबाद/अकोला/ नाशिक/नेरुळ/भांडुप/कोल्हापूर/कल्याण.
१३) आस्थापना अधिकारी (मनुष्यबळ व विकास), महावितरण, मुंबई
१४) प्रणाली विश्लेषक, संगणक केंद्र, महावितरण, भंडारा/बुलढाणा/धुळे/जळगाव/लातूर/नांदेड/पेण/सातारा/सोलापूर.
१५) निवासी वरिष्ठ लेखा परिक्षण अधिकारी, (शा.ले.प.), महावितरण, प्रकाशगड/प्रकाशगंगा.
१६) सर्व भरारी पथके, महावितरण,

**प्रत सस्नेह रवाना :**

उपाध्यक्ष (भिवंडी ऑपरेशन), टोरंट पावर लिमिटेड,
जुना आग्रा रोड, अंजुर फाटा, भिवंडी- ४२१०३०२.

C:\Sa hake\MARATHI COMM CIR\Power loom subsidy Circular.doc